**Darshanam.org**

**Dr. Pooja Sardeshmukh**
#203 Amruta Apartments
Ashok Path, Off Law college road
Erandavane, Pune, 411004
email: Pooja.chandrakant@gmail.com

---

कृपया प्रसिद्धीसाठी :

## ‘दर्शनम’ तर्फे सतारवादनाच्या दोन कार्यशाळांचे आयोजन

‘दर्शनम’ या भारतीय संस्कृतीच्या प्रसारार्थ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थेच्या दिवंगत पं. चंद्रकांत सरदेशमुख यांच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आलेल्या ‘पं. चंद्रकांत सरदेशमुख म्युझिक ॲकेडमी’च्या वतीने, पुण्यामध्ये सतारवादनाच्या कार्यशाळेचे आयोजन केले असून, त्यामध्ये सतारवादनाचे प्राथमिक धडे घेणाऱ्यांसाठीचे दि. १ ते ३ एप्रिल; तसेच पुढील (ॲडव्हान्स) शिक्षण घेण्याऱ्यांसाठी दि. ६ ते ८ एप्रिल २०१२ या दरम्यान दोन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळांचे वैशिष्ट्य म्हणजे इंदोर येथील प्रसिद्ध सतार, विचित्रवीणा आणि जलतरंगवादक श्रीमती डॉ. रागिणी त्रिवेदी तसेच जयपूर येथील वनस्थळी विद्यापीठातील संगीताचे प्राध्यापक आणि भोजपुरी लोकसंगीताचे अभ्यासक डॉ. संतोष पाठक हे दोन मान्यवर संगीतप्रेमींना मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. रागिणी त्रिवेदी आणि डॉ. संतोष पाठक हे दोघेही पंडित चंद्रकांत सरदेशमुख यांचे निकटवर्तीय होते. कार्यशाळांच्या समारोपप्रसंगी डॉ. रागिणी त्रिवेदी आपल्या सतारवादनाने पंडित चंद्रकांत सरदेशमुख यांना श्रध्दांजली वाहणार आहेत. सदर कार्यशाळेमध्ये पंडित चंद्रकांत सरदेशमुख यांचे विदेशातील अनेक शिष्य सहभागी होणार आहेत. वरील दोन्ही कार्यशाळा या २०३, अमृता अपार्टमेंट्स, अशोक पथ, लॉ कॉलेज रस्ता, दामले सभागृहामागील गल्ली, पुणे-४ या ठिकाणी आयोजित केल्या आहेत.

या कार्यशाळांसाठी प्रवेशमूल्य असून, इच्छुकांनी अधिक माहिती व नोंदणीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा : 'दर्शनम', द्वारा : डॉ. सुधा अकलुजकर, दूरध्वनी - (०२०) २५५३४०३२; मोबाईल - ९८५०९५७६९१; ईमेल - sudha_aklujkar@yahoo.com

---

दि. २१ मार्च २०१२.

डॉ. सुधा अकलुजकर

१२०१, ए/३, नीलकंठ अपार्टमेंट्स, घोले रस्ता, हॉटेल सूर्याजवळील गॅरेजसमोर, पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी - (०२०) २५५३४०३२; मोबाईल - ९८५०९५७६९१.